RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना - NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O मधून वितरित केला जातो.



अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

## "श्रीराम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा!"



वर्ष ४२ वे
अंक ४ वा
१० एप्रिल २०२१
किंमत १ रूपया

## "सभासद, जाहिरातदार आणि वाचक सर्वांना नूतन संवत्सराच्या हार्दिक शुभेच्छा!"

# सुखांत जीवनाचा

लेखक : ॲड. अविनाश जनार्दन भिडे, नाशिक

वेळीच त्याला वैद्यकिय औषधोपचार मिळाला असता तर एखाद वेळेस त्याचा आजार आटोक्यात आला असता. पण स्वत: पेशंटची दवाखान्यात जाऊन योग्य उपचार घेण्याची मनस्थिती नव्हती, म्हणून ही वेळ आल्याचे चैतन्यला समजले.

एका हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून अतिशय उत्तम काम करणाऱ्या मुलीला स्तनांचा कॅन्सर झाल्याचे निदान झाले होते. संपूर्ण घर तिच्याच कष्टांवर चालत होते. तिचा नवरा काहीच उद्योग, धंदा करीत नव्हता. टारगेटेड केमोथेरपी किंवा साधी केमोथेरपी केली असती तर फरक पडला असता. पण तिच्या नवऱ्याने घरदार गहाण ठेवत लाखो रूपये कर्ज काढत अघोरी उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला व ती नर्स ३/४ महिन्यातच दगावली. म्हणजे योग्य उपाय तर झाले नाहीतच. वरती कर्जाचा डोंगर उभा राहिला, पण घरातील कर्ती स्त्री मात्र जगू शकली नाही.

या उलट असाच ॲडव्हान्स स्टेजचा कॅन्सर झाला आहे असे कळताच त्या पेशंटच्या जवळच्या नातेवाईकांनी सूज्ञ निर्णय घेत, केमोथेरपी, इम्युनो थेरपी थांबवत त्या पेशंटचा अंत जास्तीतजास्त सुखमय कसा होईल याचा प्रयत्न केल्याचेही चैतन्यला कळले.

एक पेशंट तर स्वत: डॉक्टर असल्याचे व त्यांना २८ व्या वर्षीच फुफ्फुसांचा कॅन्सर झाल्याचे समजले. त्यामुळे ते डॉक्टर मानसिकदृष्ट्या अत्यंत खचले होते. कॅन्सर फुफ्फुसात सर्वदूर पसरलेला असल्यामुळे ऑपरेशन करू नका असा सल्ला मिळूनही त्यांनी ऑपरेशन केल्याचे व त्याचा काही उपयोग न झाल्याचे पण कळले.

एक तेरा वर्षाचा मुलगा ल्युकेमियासारख्या गंभीर आजाराने आजारी होता. आजार फारच दुर्मिळ होता. कारण त्याच्या प्लॅटलेटस्‌ची वाढ अनियंत्रित होती व त्यास अंतर्गत रक्तस्राव पण होत होता. त्याच्या आईवडिलांना पन्नास/साठ लाख रुपये खर्च सांगितला होता. दुसरा मुलगा चौदा वर्षांचा, त्याला पण ल्युकेमिया होता व आजार खूपच बळावला होता.

त्यावेळी चैतन्यला ''**मेक अ विश फाऊंडेशन**'' या संस्थेचे नाव कळले. ज्यांचा आजार विकोपाला गेला आहे, अशा मुलांची इच्छा – जशी की, श्री. रतनजी टाटा यांना भेटायचे आहे किंवा त्याला काही तासांसाठी कलेक्टर किंवा कमिशनर ऑफ पोलिस व्हायचे आहे अशा त्याच्या इच्छाही संस्था पूर्ण करण्याचा प्रयत्न करते.

लहान मुलांच्या बाबतीत त्यांचे वय ही जमेची बाजू असते. पण वेळीच व योग्य उपचार होणेही गरजेचे असते.

अशी एक ना अनेक उदाहरणे चैतन्यला समजत गेली व तो आणखी अस्वस्थ झाला. रोगाचे निदान झाल्यावर त्या रोगावरील योग्य तो औषधोपचार होणे अत्यंत गरजेचेच आहे. पूर्वी असाध्य असलेल्या रोगांवर सध्या चांगली उपचार पद्धती उपलब्ध आहे. नवीन नवीन शोधही लागत आहेत. त्यामुळे मनुष्याचे आयुष्यमान पण चांगले वाढलेले दिसत आहे. औषधोपचार जेवढ्या लवकर सुरू होईल तेव्हढा फायदाच होणार असतो. परंतु जेव्हा अशी अवस्था येते जिथे त्या पेशंटचा आजार बरा होण्याची शक्यता धूसर झालेली असते, मावळलेली असते, तिथे मात्र पेशंटने किंवा त्याच्या नातेवाईकांनी, आर्थिक परिस्थिती चांगली असो अथवा नसो समंजस भूमिका घेऊन त्या पेशंटच्या शरीराची प्रयोगशाळा होणार नाहीना हे बघितले पाहिजे. तसेच त्या पेशंटचे राहिलेले आयुष्य त्याला सुसह्य कसे होईल, तो त्याच्या आप्त स्वकीयांबरोबर त्याचा शेवटचा काळ कसा घालवील, सुख–दु:खाच्या चार गोष्टी कशा बोलेल यांचा विचार होण्याची आवश्यकता आहे असे चैतन्यच्या मनात विचार घोळत राहिले व तो आणखीच अस्वस्थ होत गेला.

**शेवटी याबाबत अजून खोलात जाण्याची, अभ्यास करण्याची इच्छा चैतन्यला झाली आणि त्याने आपल्या काही वकिल मित्रांना या बाबत विचारण्याचे ठरविले. तेव्हा त्याला त्याच्या वकिल मित्रांकडून अशी माहिती मिळाली की,**

पि. रथिनम विरूद्ध युनियन ऑफ इंडिया (1994 (3) SCC 394) या केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने जीवन

जगण्याच्या अधिकारातच जीवन संपवण्याचा पण अधिकार अंतर्भूत आहे हे घालून दिलेले तत्व त्यानंतर ग्यानकौर विरूद्ध स्टेट ऑफ पंजाब (1996 (2) SCC 648) या केस मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या ५ न्यायाधीशांच्या खंडपीठाने योग्य नसल्याचे सांगत, जीवन जगण्याच्या अधिकारात जीवन संपविण्याचा अधिकार अंतर्भूत नसल्याचे व संविधानाने जीवन संपविण्याचा (Right to Die) अधिकार भारतीयांना दिलेला नाही हे तत्व घालून दिले. परंतु त्या दोन्ही न्याय निर्णयात दयामरणाच्या अधिकारांबद्दल फारसा उहापोह झालेला चैतन्यला दिसला नाही.

**दयामरण,** ज्याला इंग्रजीत **युथेनिशीया (Euthanasia)** म्हणतात, म्हणजे असाध्य रोगाने पिडीत झालेल्या व्यक्तीस त्याच्या इच्छेप्रमाणे त्याचा मृत्यू घडवून आणणे (व त्याच्या यातना संपविणे.) या प्रकाराला मर्सीकिलिंग असेही संबोधले जाते. दयामरणाचा कायदा काही देशांमध्ये जसे की नेदरलॅन्ड, स्वित्झर्लंड, बेल्जियम, स्पेन ऑस्ट्रिया, इटली, जर्मनी, फ्रान्स या देशांमध्ये काही प्रमाणात आहे. त्या देशांमध्ये काही तांत्रिक गोष्टींची पूर्तता झालेली असेल व काही संरक्षक बाबी लक्षात घेतल्या असतील तर दयामरणाची इच्छा व्यक्त केलेल्या मरणासन्न (टर्मिनली इल) रूग्णांना परवानागी देण्याचा कायदा आहे. परंतु तसा कायदा भारतामध्ये नाही. त्यामुळे आतापर्यंत अनेक वेळा दयामारणाची परवानगी मागणाऱ्या याचिका दाखल झालेल्या असूनही उच्च न्यायालयाने व सर्वोच्च न्यायालयाने तशी परवानगी नाकरलेली आहे.

**इच्छामरण / दयामरण –**

इच्छामरण / दयामरण (Euthanasia) चे दोन प्रमुख प्रकार आहेत – १) Active Euthanasia म्हणजे सक्रीय इच्छामरण व २) Passive Euthanasia म्हणजे निष्क्रीय इच्छामरण.

Active Euthanasia मध्ये टर्मिनली इल, मरणासन्न रूग्णाच्या मृत्यूच्या, दयामरणाच्या मागणीवरून व जरूर त्या सर्व परवानग्या घेतल्यानंतर त्या रूग्णास विशिष्ट औषधाचा मोठा डोस दिला जातो. ज्यामध्ये पेशंट गाढ निद्रेत जातो व शेवटी त्यातच त्याचा अंत होतो. ही सर्व प्रक्रिया तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली व सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगीनेच केली जाते. या मध्ये ॲक्टिव्ह म्हणजेच सक्रिय याचा अर्थ मरणासन्न रुग्णाचा वेदनारहित मृत्यू कोणतीतरी क्रिया जसे की, इंजेक्शनचा मोठा डोस देऊन केली जाते. जगाच्या काही भागात याला ‘फिजिशिअन असिस्टेड सुसाईड’ म्हटले जाते. जगात अनेक देशात आणि भारतातही Active Euthanasia ला परवानगी नाही. उलट पक्षी तो गुन्हाच ठरतो.

Passive Euthanasia म्हणजेच निष्क्रीय दयामरण या प्रकारात टर्मिनली इल म्हणजेच मरणासन्न रुग्णाला दिली जाणारी ट्रिटमेंट जसे की रेडिएशन थेरपी, ॲन्टीबायोटिक्स व इतर उपचार पद्धती थांबविली जाते व रुग्णाचे नैसर्गिक मरण जेव्हा येईल तेव्हा ते येते. म्हणजेच त्याचा मृत्यू घडवून आणला जात नाही. उदाहरणार्थ एखाद्या रुग्णाला जो मरणासन्न आजाराने ग्रस्त आहे, त्याला जिवंत रहाण्यासाठी सतत किंवा दर दिवशी डायलिसिस ची आवश्यकता असेल तर डायलिसिस मशिन व इतर तांत्रिक सुविधा उपलब्ध असतानाही डायलिसिस करण्याचे थांबविणे किंवा एखादा रुग्ण जो कोमामध्ये आहे, परमनंट व्हेजिरेटिव्ह स्टेट (PVS) मध्ये आहे किंवा ज्याची हृदय स्पंदन क्रिया किंवा श्वासोच्छवास मशिनद्वारा चालू आहे, म्हणजेच व्हेंटिलेटर वर आहे, अशा रुग्णाचे व्हेंटिलेटर मशिन बंद करणे, काढून घेणे. किंवा व्हेजिटेटिव्ह, कोमा स्टेजमध्ये आहे किंवा ज्याचा ब्रेन डेड झालेला आहे, अशा पेशंटचा द्रव आहार व लाईफ सपोर्टिंग उपचार थांबविणे त्या रुग्णाच्या नैसर्गिक मृत्यूच्या आड न येणे हे व अशा सर्व प्रकारांना Passive Euthanasia निष्क्रीय इच्छा मरण म्हणतात.

काही वेळेला रुग्णाला झालेला आजार बळावत जात असताना त्या आजाराची गंभीरता रुग्णाला समजते किंवा रुग्ण शुद्धीत असतो, ज्याची समजून घेण्याची मानसिकता असते, डॉक्टर त्याला आजाराच्या गंभीरतेची व आता कितीही व कोणतेही औषधोपचार केले तरी आजार बरा होणार नाही, आपण केवळ आजाराचा कालावधी लांबविणार आहोत ही माहिती रुग्णाला देतात. अशा वेळी रुग्ण व त्याचे सर्व आप्तस्वकीय, नातेवाईक एकमेकांशी चर्चा करतात व

सूज्ञपणे औषधोपचार थांबविण्यास परवानगी देतात. याला Informed concent माहिती देऊन घेतलेली संमती असेही संबोधले जाते. परंतु काही वेळा रुग्ण कोमात असतो, बेशुद्ध असतो किंवा व्हेजिटेटिव्ह स्टेट, ब्रेन डेड स्टेज मध्ये असतो म्हणजेच Incompitant असतो. त्यावेळी रुग्ण शुद्धीत व सतर्क असेल तर त्याने काय योग्य निर्णय घेतला असता तसा निर्णय त्याचे नातेवाईक किंवा स्नेही स्वकीय एकमेकांशी चर्चा करून व तज्ज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊन तसा निर्णय घेतात.

त्यामुळे इच्छामरणाला परवानगी द्यायची की नाही ह्या मुद्यावर चर्चा व विचारविनिमय न होता आणखी औषधोपचार चालू ठेऊन त्या रुग्णाच्या हालअपेष्टा व शारीरिक वेदना चालूच ठेवत त्याचे जीवन लांबवायचे की त्याचे होणाऱ्या नैसर्गिक मृत्यूचा मार्ग मोकळा करायचा, यावर चर्चा होणे जास्त संयुक्तिक ठरू शकेल.

परंतु भारतीयांची मानसिकता, वैचारिक क्षमता, सामाजिक परिस्थिती, अशिक्षिततेचे प्रमाण, आर्थिक परिस्थिती व त्यामधील दरी, तफावत आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या सर्व प्रकारांचा गैरफायदा घेतला जाण्याची मोठी शक्यता लक्षात घेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाने नर्स अरूणा शानबागच्या केसमध्ये रुग्ण सक्षम (कॉम्पिटंट) आहे की असक्षम (इनकॉम्पिटंट) किंवा इनफॉर्मड् कन्सेट आहे किंवा नाही किंवा चालू असलेला औषधोपचार थांबवायचा, तो कधी थांबवायचा, त्याचा निर्णय कोणी घ्यायचा वगैरे गोष्टींचा विचार न करता म्हणजेच इच्छामरण / दयामरणाला परवानगी देता येत नाही जो पर्यंत दयामरण / इच्छामरणा संबंधीत कायदा पारित केला जात नाही अशा आशयाचे मत व्यक्त करीत सन २०११ मध्ये निकाल दिला.

२०११ मधील नर्स अरुणा शानबाग केसनंतर लॉ कमिशन ऑफ इंडिया यांनी त्यांचा २४१ वा रिपोर्ट "Passive Euthanasia-Relook" ऑगस्ट २०१२ मध्ये प्रसिद्ध केला. त्या रिपोर्टमध्ये Passive Euthanasia म्हणजेच निष्क्रीय इच्छामरण चा कायदा त्याबाबतच्या खबरदारीच्या उपाययोजनांसह संमत झाला पाहिजे अशी शिफारस केली.

**(क्रमशः)**

## भावपूर्ण श्रद्धांजली



श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरच्या, माजी नगराध्यक्षा व भाजपच्या शहर उपाध्यक्षा **कै. सौ. अनघा फडके** यांचे दि. २७ मार्च २०२१ ला वयाच्या ४८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे पती श्री. नारायण फडके व एक मुलगी आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात त्यांनी नगराध्यक्षा म्हणून जबाबदारी सांभाळली होती. तसेच महिला मंडळाच्या माध्यमातून शहरातील राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांमध्ये त्या आघाडीवर होत्या.

## भावपूर्ण श्रद्धांजली



**श्रीमती माधुरी चंद्रशेखर गोंधळेकर,** ह्यांचे दि. २४ फ्रेब्रुवारी २०२१ ला वृद्धापकाळाने वयाच्या ८५ वर्षी दुःखद निधन झाले.

गेली कित्येक वर्षे त्या आपल्या संस्थेच्या देवीच्या नवरात्रीच्या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सक्रिय सहभागी असायच्या. अत्यंत प्रेमळ, मनमिळाऊ व उत्साही असा त्यांचा स्वभाव होता.

आपल्या संस्थेचे सभासद श्री. गोंधळेकर बंधूंच्या त्या मातोश्री होत्या. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## भावपूर्ण श्रद्धांजली



आपल्या संस्थेच्या आजीव सभासद, इंदिरानगर येथील **प्रतिभा प्रभाकर पेंडसे** यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले.

ज्येष्ठ तबला वादक सतीश पेंडसे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## वृत्तपत्र मालकी तसेच अन्य विषयासंबंधी तपशील

### ✻ घोषणा फॉर्म - ४ ✻

| | | |
|---|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | – | **चित्तपावन ब्राम्हण संघ,** काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक – २. |
| २) प्रकाशन अवधी | – | मासिक (दर महा) |
| ३) मुद्रकाचे नांव | – | **मीरा एंटरप्राईजेस,** नाशिक. |
| भारतीय नागरिक आहे काय? | – | होय |
| पत्ता | – | **मीरा एंटरप्राईजेस,** २ जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक – २. |
| ४) प्रकाशकाचे नांव | – | **श्री. विजय राजाराम साने** |
| पत्ता | – | **चित्तपावन ब्राम्हण संघ,** काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक – २. |
| भारतीय नागरिक आहे काय? | – | होय |
| ५) संपादक | – | **श्री. विजय राजाराम साने** |
| पत्ता | – | **चित्तपावन ब्राम्हण संघ,** काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक – २. |
| भारतीय नागरिक आहे काय? | – | होय |
| ६) वर्तमान पत्राचे मालक किंवा भांडवलाच्या एक टक्क्याहून अधिक भागाचे हिस्सेदार यांचे नांव व पत्ते | – | संस्था संपूर्ण मालक आहे. |

मी अध्यक्ष **चित्तपावन ब्राम्हण संघ,** नाशिक याद्वारे असे घोषित करतो की, माझ्या कमाल माहिती आणि विश्वासनुसार वर दिलेला तपशिल सत्य आहे.

सही
**विजय साने**

## भावपूर्ण श्रद्धांजली



आपले आजीव सभासद श्री. जगदिश शांताराम फडके, यांच्या मातोश्री, **श्रीमती शैलजा शांताराम फडके,** (वय ८७ वर्षे) यांना त्यांच्या निवासस्थानी दि. १३ फेब्रुवारी २०२१ रोजी देवाज्ञा झाली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, ही प्रार्थना. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम,
प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

# मिहिर कन्स्ट्रक्शन

**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस :** २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल :** ०९४२२२४६८७८
**ईमेल :** cvranade@gmail.com

**आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...**



**अदृश्य श्रवणयंत्र**

# एक उपयुक्त दागिना...!

**अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध**

**अनुभवी तज्ञांचे मार्गदर्शन**

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

**संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य**
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
**Ph.: 2318333, Mob : 9422269394**

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक

* अटी लागू

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ४७४ | **प्रथमेश अतुल भिडे**<br>२०२, स्पर्श हाइटस, आयनॉक्स मल्टिप्लेक्स समोर, अशोका टायर्स शेजारी, नाशिक-पुणे रोड, नाशिक - ४२२ ०११. मो.: ९४२०८४९७५८ | २२/०१/१९९२ | नित्युंदन | ५'.६'' | BE (ENTC) | २५,०००/- |
| ४७५ | **श्रीकांत धनंजय फडके**<br>फ्लॅट नं. ११ व १२, श्री पूजा अपार्टमेंट, पोस्ट ऑफिसच्या वरती, उद्यान कॉलनी, इंदिरानगर, नाशिक - ४२२ ००९. फोन : ०२५३-४०३८४९८ मो.: ९४०४२१०५६२ | २८/११/१९९२ | अत्री | ५'.८.५'' | BE IT + C dac | ४२,०००/- |
| ४७६ | **प्रतिक धनंजय गोखले**<br>१४७५, पेंडसे सदन, पगडबंद लेन, नाशिक - ४२२ ००१. फोन : ०२५३-२५०४५१८ मो.: ९५१८३७८५७७ | १९/०९/१९९० | काश्यप | ५'.८'' | बी.कॉम लॉजेस्टिक डिप्लोमा | १६,०००/- |
| ४७७ | **अभिजित सुमंत दीक्षित**<br>फ्लॅट नं. ९, गुरूकुल अपार्टमेंट, के. के. वाघ कॉलेजच्या मागे, दुर्गानगर, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३. मो.: ९२८४७५६०३३ / ७७०९५४०४९८ (आई) | १८/०९/१९९१ | कृष्ण अत्रेय | ५'.७'' | BE Product | १८,३००/- |
| ४७८ | **राहुल अजय जोशी**<br>रूम. नं. २०३, उपेंद्रनंद, सरस्वती नगर, ६ व्या स्किम समोर, अंबड लिंक रोड, नाशिक - ४२२ ०१०. मो.: ९५६१८३७८४३ / ९७६६१०३५६७ | १३/०९/१९९१ | शांडिल्य | ५'.६'' | B.Com | २०,०००/- |
| ४७९ | **रोहित नारायण आठवले**<br>९, सत्यदर्शन अपार्टमेंट, सुचितानगर, नाशिक - ४२२ ००९. फोन : ०२५३-२५९२४७४. मो.: ९८२२८०८९६० | २१/१०/१९९२ | अत्री | ५'.५'' | BE (Etec) | ३५,०००/- |
| ४८० | **धनंजय नरहरी सोमण**<br>१०१, गणेश दर्शन, खेमागल्ली, अग्यारी लेन, जांभळीनाका, जि. ठाणे. मो.: ९९३०६७१४५६ / ९९३०६०५१६५ | १६/०७/१९८९ | शांडिल्य | ५'.६'' | १२ वी पास पौरोहित्य | ३०,००० ते ४०,०००/- |
| ४८१ | **गौरव नरहरी सोमण**<br>मु. करंजाळी, पो. फणसु, ता. दापोली, जि. रत्नागिरी. मो.: ०८३९०३१३१०४ / ९२७००३००५७ | २६/०४/१९९२ | शांडिल्य | ५'.१०'' | Mech / Engg. Diploma | १५,००० ते २०,०००/- |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| २१५ | **गौरी श्रीपाद डोंगरे**<br>४/६, वैष्णव संकुल, लॅम रोड, दत्त पेट्रोल पंप समोर, महाराजा स्टॉप, नाशिकरोड - ४२२ १०१.<br>मो.: ७८७५५४८२४५ | ०५/०९/१९९२ | शांडिल्य | ५' | M.A. English M.A. Psychology B.Ed. | - |
| २१६ | **मैत्रेयी धनंजय दामले**<br>सुधा बंगला, प्लॉट नं.१२, स.नं. १०२/१, शिव कॉलनी, वडाळा-पाथर्डी रोड, नाशिक-४२२ ००९.<br>मो.: ७७२००६५५७४ / ९८२२८७६८४१ | ०३/०९/१९९६ | शांडिल्य | ५'.४'' | एम.एस्सी. मायक्रो. | २०,०००/- |
| २१७ | **मानसी नंदकुमार बाळ**<br>सी-९, तिरुमला आस्था, चेतना नगर, नाशिक - ४२२ ०१०.<br>मो.: ९८५०३१५३९४ | २१/०४/१९९५ | बाभ्रव्य | ५'.३'' | बी.कॉम. | - |
| २१८ | **डॉ. भाग्यश्री महेश गोखले**<br>ए-१६, दि. रेनिसन्स अपार्टमेंट, दामोदर फडके नगर, गोविंद नगर, नाशिक - ४२२ ००९.<br>मो.: ७२७६५२६९३९ | २१/०७/१९९४ | काश्यप | ५'.४'' | डॉक्टर | ३५,०००/- |
| २१९ | **ऐश्वर्या सुशांत करमरकर**<br>दत्त अपार्टमेंट, बालिकाश्रमरोड, सावेडी, अहमदनगर - ४१४ ००३.<br>मो.: ८४२१७४३०२५ | २६/१०/१९९६ | काश्यप | ५'.६'' | एम.एस्सी | - |
| २२० | **शिवानी सदानंद लोंढे**<br>फ्लॅट नं. १०, बिल्डींग नं. १३, नरसिंह नगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.<br>फोन : ०२५३-२३४०५५०. मो.: ९९७०६२३१७५ | ०९/०१/१९९७ | गार्ग्य | ५'.७'' | M.Com CA (Computer) | २०,०००/- |
| २२१ | **ऋतुजा अविनाश लिमये**<br>४, मनोरमा हौसिंग सोसायटी, स्वामी समर्थ वास्तु संकुल, तरण तलावाजवळ, घाडगे मळा, नाशिकरोड-१०१.<br>मो.: ९९२२०५०३९५ / ९८८११६७५३५ | ०८/०९/१९९४ | कपी | ५'.३'' | BCA (Computer) | ७,०००/- |
| २२२ | **मृण्मयी संकेत कुलकर्णी**<br>घर. नं. १२३५, गणेश टेक, भागवत शेजारी, नाशिक - ४२२ ००१.<br>मो.: ९३७१२३६२९० | ०४/०१/१९९४ | शौवक | ५'.४'' | B.Com | - |
| २२३ | **कामिनी प्रमोद काळे**<br>फ्लॉट नं. ९-बी, सातभाई नगर, जेलरोड, नाशिकरोड.<br>मो.: ८२०८०१४१०५ / ८०८०७४३६१३ | १६/११/१९८९ | भारद्वाज | ५'.२'' | फॅशन डिझाइन | २०,०००/- |

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था व टकले बंधू यांच्या संयुक्त विद्यमाने

सुवर्ण संचय समृद्धी योजना

बघता बघता वर्ष-दोन वर्षावर मुला मुलींचं लग्न येऊन ठेपलं आहे!
गुंतवणुकीचा उत्तम व खात्रीशीर पर्याय शोधत आहात ?
सोने खरेदी करायचे आहे? शेअर मार्केट धक्के देतंय?
पण महागाई व वाढत्या भावामुळे शक्य होत नाहिये?

थांबा, काळजी करू नका, आपली ही काळजी दूर झाली आहे.

तुमच्या सोयीने हवे तेवढे सोने आजच खरेदी करा. ते पण सोन्याच्या आजच्या भावाच्या फक्त २५% रक्कम भरून. उर्वरित रकमेची सुलभ मासिक हप्त्यांमध्ये एका वर्षात परतफेड करा. लग्नात लागणारी अपरिहार्य गोष्ट किंवा वर्षानुवर्षांपासून सिद्ध झालेला उत्तम गुंतवणुकीचा पर्याय म्हणून देखील सोने हाच पर्याय आहे.

आमचे ध्येय... "तुमची धनसमृद्धी"

अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था
फोन : (०२५३) २३१३७०९/ ९१६८४२६८८८

टकले बंधू, सराफ बाजार
फोन : ०२५३-२५९४१५४, २५९६६५४, २५९९०५४

विचार कसला करताय, येताय ना मग !

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक- २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ - २५७६२४१**

प्रति, ____________________

____________________

____________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.